Peer Reviewed Journal

ISSN 2319-8648

Impact Factor (SJIF)

Impact Factor - 7.139

# Current Global Reviewer

International Peer Reviewed Refereed Research Journal Registered & Recognized
Higher Education For All Subjects & All Languages

# Changing Religious Movements in Pre-Medieval Indian History

17-18 January 2020 Special Issue - 101 Vol. I

Chief Editor
Mr. Arun B. Godam

Guest Editors
Dr. B. G. Gaikwad
Principal
Shivaji College, Hingoli (MS)

Co-Editor
Dr. Balasaheb Shankarrao Kshirsagar
Head, Department of History
Shivaji College, Hingoli (MS)

Co-Editor
Dr. Sandeep G. Londhe
Department of History
Shivaji College, Hingoli (MS)

CURRENT GLOBAL REVIEWER International Multidisciplinary Research Journal | ISSN- 2319-8648
Impact Factor - (SJIF) - 7. 139 | Special Issue -101 , Vol. I | Jan. 2020 | Peer Reviewerd

# Index


1. The Concept of Dhamma in Ancient and Pre-Medieval Period: A Critical Perspective — 1
   Dr. Rahul Varvantikar
2. The History Of Subaltern And Oppressed: A Review — 4
   Prof. Dr. Rajkumar S. Kamble
3. 'Rise of the Sect of Tantra and Pre Medieval Era – A Critical Study' — 7
   Dr. Londhe Sandeep Govindrao
4. "Pre-Medieval Religious Movements – Special Reference toBhaktism" — 10
   Dr. Kashinath N.Chavan
5. Religious Revival in South India — 15
   Dr. Benjalwar S.G.
6. Religious Movements and Literature: Character study of Rosie and Ammu — 18
   Dr. Ravi Satbhai
7. Philosophy of Buddhism: An Ambedkarite Perspective — 21
   Nirajkumar Deomanrao Ambhore
8. Religious Reform Movements In India — 24
   Ramprasad M. Vhadgir
9. Sufism: An Early Medieval Religious Movement — 28
   Dr. Kashinath N.Chavan
10. Causes of Decline of Buddhism In Medieval Period : A Brief Study — 31
    Dr. Sukhadev Piraji Balkhande
11. Warkari Cult and Humanity — 35
    Ramprasad M. Vhadgir
12. जागजी बारव स्थापत्य एक धार्मिक दृष्टीक्षेप — 37
    डॉ.गंगथडे आर.डी.
13. वीरशैव साहित्य-ऐतिहासिक साधन — 39
    प्रा.डॉ. जी.एस.पाटील.
14. नाथ संप्रदायातील गुरु-शिष्य परंपरा — 42
    डॉ.भेलोंडे जगदीश व्यंकटराव
15. मध्ययुगीन भारतीय इतिहासातील स्त्री दर्शन — 44
    डॉ. राजेंद्र साहेबराव धाये,
16. पूर्वमध्यकालीन तंत्रशास्त्र — 47
    प्रा. डॉ. अरविंद सोनटक्के
17. महात्मा बसवेश्वर - धर्मसुधारणा व तत्वज्ञान — 50
    डॉ. विठ्ठल व्यंकटराव घुले
18. शंकराचार्यांचा अद्वैतवाद - एक अभ्यास — 55
    प्रा. डॉ. क्षिरसागर बि.एस.


PRINCIPAL
Shivaji College, HINGO

**CURRENT GLOBAL REVIEWER** International Multidisciplinary Research Journal | ISSN- 2319-8648
Impact Factor - (SJIF) – 7. 139 | Special Issue -101 , Vol. I | Jan. 2020 | Peer Reviewerd

37. भारतातील महत्त्वपूर्ण संप्रदाय : शैव संप्रदाय 101
भिकाणे शोभा राजेंद

38. प्राचिन भारतातील शैव परंपरा 105
शिंदे संदीप शिवाजीराव

39. धार्मिक चळवळीतील वंचीतांचे योगदान– आदिवासी 107
डॉ. बी.एस.क्षिरसागर , प्रा. जी. एम. घुटे

40. विरशैव संप्रदाय 110
प्रा.डॉ.बोचरे जे.एम

41. तांत्रिक पंथाचे विचार 112
प्रा. डॉ. सुभाष रामराव रगडे

42. धार्मिक चळवळी व बौध्द धम्म 114
प्रा.डॉ.प्रकाश संभाजी वाघमारे

43. सुफी संप्रदायाच्या तात्त्वीक भूमिकेचा विकास 118
प्रो.डॉ.शारदा गोविंदराव बंडे

44. भारतातील बौध्द धम्म चळवळ- एक दृष्टिक्षेप 120
प्रा.डॉ. बी.एम.नरवाडे

45. महात्मा बसवेश्वर आणि संत गाडगेबाबा 123
प्रा.सचितानंदशं.बिचेवार

46. लिंगायत धर्म लोकचळवळ : महात्मा बसवेश्वराचे धार्मिक व सामाजिक सुधारणेतील योगदान 127
प्रा.राजकुमार ज्ञानोबा चाटे

47. धार्मिक चळवळींचा स्थापत्यादी कलांवर पडलेला प्रभाव 130
प्रा.डॉ. महेंद्र यादवराव घनसावंत

48. वर्तमान सामाजिक व धार्मिक एकात्मतेसाठी-भक्ती चळवळीची उपयुक्तता 133
डॉ.संतोष सुधाकरराव कोटुरवार

49. संत तुकाराम व संत रामदास यांच्या साहित्यातून समाजदर्शन 135
प्रा. सौ. गीता विशे

50. भारतीय राजकारणातील धर्मांचा वाढता प्रभाव - एक दृष्टिक्षेप 139
प्रा.सि.एन पुरी

51. शैव पंथातील नाथ संप्रदाय 143
प्रा. डॉ. संजय भाऊराव गिरे

52. नाथ संप्रदायाचे तत्त्वज्ञान व त्याचा प्रभाव एक अभ्यास 146
प्रा.धनेश मधुकर हरड

53. पूर्व मध्ययुगीन महाराष्ट्रातील संत चळवळ : एक आकलन 148
प्राचार्य डॉ. बबन पवार

PRINCIPAL
Shivaji College, HINGOLI

CURRENT GLOBAL REVIEWER International Multidisciplinary Research Journal | ISSN- 2319-8648
Impact Factor - (SJIF) – 7. 139 | Special Issue -101, Vol. I | Jan. 2020 | Peer Reviewerd

# शंकराचार्यांचा अद्वैतवाद - एक अभ्यास

प्रा. डॉ. क्षिरसागर बि.एस.
इतिहास विभाग प्रमुख, शिवाजी महाविदयालय, हिंगोली.

---

**प्रस्तावना**

तत्त्वज्ञान म्हणजे तत्त्वासंबंधीचे ज्ञान. तत्त्वज्ञान ही एक अतिव्यापक संकल्पना आहे. भारतीय तत्त्वज्ञान प्राचीन काळापासून निर्माण झालेले, रुजलेले, मान्य झालेले आणि लोकमानसात व लोक जीवनात स्थिर होउन देशाच्या संपूर्ण अंतर्बाह्य जीवनाला व्यापून टाकले आहे. अशा तत्त्वज्ञानास भारतीय तत्त्वज्ञान म्हटले जाते. भारतीय तत्त्वज्ञानात अनेक विविधअंगी प्रवाह आहेत. त्यांचे विभाजन प्रामुख्याने दोन प्रकारात केले जाते. त्यातील पहिला प्रवाह चैतन्यवादी (Idealism) व दुसरा जडवादी. (Materialism) या दोन्ही प्रवाहांवर जगात अनेक विचार मांडले गेले आहेत. पाश्चिमात्य तत्त्ववेत्त्यांमध्ये प्लेटो, बर्कले, हयूम, हेगेल हे तत्त्वज्ञ चैतन्यवादी होते. भारतीय तत्त्ववेत्त्यांमध्ये शंकराचार्य, मध्वाचार्य, रामानुजाचार्य आदींसारखे तत्त्वज्ञ चैतन्यवादी तर कपिल, बृहस्पती, चार्वाक, कणाद, जैमिनी, गौतम, कुमारील भट्टसारखे तत्त्वज्ञ हे जडवादी होते.

या पैकी प्रत्येक तत्त्ववेत्त्याने आपआपल्या दर्शनांमध्ये आपआपली मते व्यक्त केली. या श्रेष्ठ तत्त्वज्ञांच्या विचारांचा पगडा आपल्या देशातील लोकांच्या मनावर विलक्षण बसल्यामुळे त्यांच्या आध्यात्मिक प्रवृत्तीच्या बीजांचा प्रवेश भारतीयांच्या कणाकणांत झाला आहे. या तत्त्वज्ञांच्या विचारांची बैठक भारतीय समाजाला मिळाल्यामुळे समाजातील राजकीय, सामाजिक, आर्थिक व कौटुंबिक बाबीच्या मुळाशी भारतीय तत्त्वज्ञान आहे.

**शोध निंबधचा उद्देश**

प्रस्तुत शोध निंबधलेखनाचा उद्देश सर्व वेदांत संप्रदायांमध्ये शंकराचार्यांचा अद्वैतवाद जाणून घेणे हा आहे.

**शंकराचार्यांचा अद्वैतवाद**

भारतीय तत्त्वज्ञांपैकी एक श्रेष्ठ तत्त्वज्ञ शंकराचार्य होत. शंकराचार्यांनी वेदांत सूत्रे, उपनिषदे आणि भगवद्‌गीता या प्रस्थानत्रयीवरचे भाष्ये लिहिली नाही तर याशिवाय अनेक ग्रंथ रचले आहेत. उपदेशसहस्री, शतश्लोकी आदी ग्रंथ आणि दक्षिणामूर्ती, आनंदलहरी आदी स्त्रोतेही त्यापैकीच आहेत. शंकराचार्यांमध्ये कवी, भक्त आणि दार्शनिक या तिन्हीचा सुरेख संगम घडून आलेला दिसतो. त्यांचे वेदांत सूत्रावरील भाष्य ब्रह्मसूत्रभाष्य किंवा शांकरभाष्य या नावाने प्रसिद्ध असून या भाष्यंवर नंतर पद्मपादांची पंचपादिका व वाचस्पती मिश्रांची भामती यासारखे अनेक टीका ग्रंथ लिहिले आहेत. सर्व वेदांत संप्रदायांमध्ये शंकराचार्यांचा अद्वैतवाद वेदान्तदर्शनाचा खराखुरा प्रतिनिधी समजणे अधिक संयुक्तिक आहे. कारण इतर संप्रदायांतील भाष्यकारांनी प्रस्थानत्रयीबरोबरच पुराणादी इतर ग्रंथांचाही आधार घेतलेला आहे. एवढेच नव्हे तर काही भाष्यकारांनी तर अन्य ग्रंथांच्या प्रतिपाद्य विषयांशी अनुकूल असेच प्रतिपादन आपापल्या भाष्यंमध्ये करण्याचा प्रयत्न केलेला दिसतो. परंतु शंकराचार्यांसमोर प्रस्थानत्रयी एवढाच ग्रंथ विभाग असून केवळ प्रस्थानत्रयीच्या माध्यमातूनच त्यांना प्रतीत होणारा विषय या प्रस्थानत्रयीचा प्रतिपाद्य विषय म्हणून त्यांनी निं:दिग्धपणे जाहीर केला. म्हणून वेदांत हा शब्द अद्वैतवादाबाबत जो वापरला जातो तो सार्थ ठरतो.

**ज्ञानशास्त्र**

मीमांसकांनी प्रतिपादित केलेले प्रमाणांचे लक्षण अद्वैतवादसुद्धा मान्य करतो. 'वेदांत परिभाषानामक' ग्रंथामध्ये अनधिगताबाधित विषयज्ञानत्व प्रमात्त्वम् अशी प्रमाण व्याख्या दिलेली आहे. या व्याख्येनुसार जे ज्ञान अनधीगत (नवीन) आणि अबाधित आहे त्याला 'प्रमा' आणि असे ज्ञान ज्या साधनांद्वारे प्राप्त होते. त्याला 'प्रमाण' असे म्हणतात. कुमारीलाप्रमाणे शंकराचार्यांनी सुद्धा प्रत्यक्ष, अनुमान, उपमान, शब्द, अर्थपत्ती आणि अनुपलब्धी ही सहाही प्रमाणे मानली आहेत. या सहा प्रमाणांपैकी शंकराचार्यांच्या मतानुसार अनुभव व प्रत्यक्ष (Perception) हे श्रेष्ठतम प्रमाण होय. वास्तविक शंकराचार्यांही गणना जागतिक श्रेष्ठतम तर्कपंडितांमध्ये केली जाते. तरी सुद्धा शंकराचार्यांनी अनुभवांशिवाय अनुमानाला देखील आधार नाही असे म्हटले आहे. यावरून अनुमानाच्या तुलनेने अनुभव किती मोलाची वस्तू आहे हे स्पष्ट होते. आधुनिक ज्ञानशास्त्रानेसुद्धा प्रत्यक्ष (अनुभव) इतर प्रमाणांचा आधार वा पाया म्हणून मान्य केले आहे.अशा रीतीने अद्वैतवादामध्ये प्रत्यक्ष प्रमाण हे महत्त्वपूर्ण साधन ठरत असल्यामुळे आणि इतर प्रमाणांची अद्वैतवादाने दिलेले माहिती जवळजवळ इतर दर्शनांसारखीच असल्यामुळे इथे फक्त प्रत्यक्षाचेच स्वरूप स्पष्ट केले आहे.

**प्रत्यक्ष**

अद्वैतवादाने प्रत्यक्षाला अपरोक्ष म्हणूनही संबोधले आहे. कोणत्याही प्रकारचे साक्षात ज्ञान म्हणजे प्रत्यक्ष वा अपरोक्ष ज्ञान होय. अद्वैतवादाच्या म्हणजे वेदान्ताच्या मते अपरोक्षानुभूतीकरिता इंद्रियसनिन्नकर्षाची अट आवश्यक नाही. सांख्य मतानुसार पंचज्ञानेंद्रिये, पंचकर्मेद्रिये आणि मन ही अहंकाराची कार्ये वा विकार मानली आहेत वेदान्ताने मात्र पंचज्ञानेंद्रिये, पंचकर्मेद्रिये आणि अंत:करण ही सर्व भौतिक (पाच भौतिक) मानली आहेत. 'अंत:करण' याचा अर्थ इथे आंतर इंद्रियज्ञानाचे आंतरिक साधन असा असून या अंत:करणांमध्ये मन,

PRINCIPAL
Shivaji College, HINGOLI

CURRENT GLOBAL REVIEWER International Multidisciplinary Research Journal | ISSN- 2319-8648
Impact Factor - (SJIF) - 7. 139 Special Issue -101, Vol. I | Jan. 2020 | Peer Reviewerd

बुद्धी, चित्त आणि अहंकार असे चार प्रकार अंतर्भूत होतात.[५] या चारांना अंतःकरण चतुष्टय असे म्हणतात. वास्तविक अंतःकरण एक असून त्याच्या क्रिया मात्र चार प्रकारच्या असल्यामुळे ते चार प्रकारचे मानले गेले आहेत.नव्हे ती चार नावे अंतःकरणाच्या चार क्रियांचीच नावे होत. संकल्प विकल्पात्मक (संशय) क्रियामनाची, निश्चय (अध्यावसाय) करण्याची क्रिया बुद्धीची चिंतन (स्मरण) करण्याची क्रिया चित्ताची आणि शेवटची अविर्भावाची व अभिनिवेशाची क्रिया ही अहंकाराची होय. अंतःकरण जरी पाच भौतिक क्रिया म्हणून मानले गेले तरी त्यांच्यामध्ये तेज (अग्नी) नामक महाभुतांचा अंश प्रधान असतो. सुसुप्ती सोडून इतर सर्व मानसिक अवस्थांमध्ये अंतःकरण सक्रिय असते.

सांख्य आणि वेदान्त यांची प्रत्यक्ष प्रक्रिया जवळजवळ सारखी आहे. सांख्याप्रमाणे वेदान्तानेसुद्धा अंतःकरणाच्या वृत्ती मानल्या आहेत. अंतःकरणाची ती किरणेच होत. किरणांप्रमाणे या वृत्ती प्रत्यक्षाच्या प्रक्रियेमध्ये अंतःकरणातून बाहेर पडून पदार्थापर्यंत जातात व त्या पदार्थांचा आकार धारण करतात. नंतर सांख्यांच्या पुरुषाप्रमाणे वेदान्ताचा आत्मा आपल्या स्वाभाविक चैतन्याने या वृत्तीनां आणि त्याद्वारे पदार्थाला प्रकाशित करतो. तेव्हा ज्ञान उत्पन्न होते.[६] उदा. घटज्ञानाच्या वेळी प्रथम अंतःकरण वृत्तिनेत्राद्वारे बाहेर पडून घटापर्यंत जाते व त्या घटाला व्यापते म्हणजे घटाकार होते. त्या घटाकार झालेल्या वृत्तीमध्ये आत्म्याचा जो प्रकाश (चिदाभास) असतो तो त्या घटाला प्रकाशित करतो. याचाच अर्थ असा की तो चिदाभास त्या घटकाचे घटरूपाने ज्ञान करून देतो. वेदान्तमध्ये ज्ञान हा शब्द दोन अर्थांनी वापरला जातो. पहिल्या अर्थाच्या दृष्टीने अंतःकरण वृत्तीनां प्रकाशित करणाऱ्या चैतन्याला साक्षीचैतन्य असे म्हणतात. हे साक्षीचैतन्य ज्ञानस्वरूप आहे. इथे ज्ञान हा आत्म्याचा गुण नसून स्वभाव आहे. आत्म्याचे चैतन्य म्हणजे आत्म्याचे ज्ञान होय. या बाबतीत वेदान्ताचा न्याय वैशेषिकांशी स्पष्ट विरोध दिसून येतो. वेदान्त ज्ञानाला आत्म्याचे स्वरूप मानतो. तर न्यायवैशेषिक ज्ञानाला आत्म्याचा गुण मानतात. या अर्थाने ज्ञान म्हणजे साक्षीज्ञान होय. दुसऱ्या अर्थाने ज्ञान वृतिज्ञान म्हणून ओळखले जाते. साक्षी ज्ञान नित्य, अखंड आणि निर्विकार असते, तर वृतिज्ञान अनित्य, अतूट आणि परिवर्तनशील असते. ज्ञाता आणि ज्ञेय यांच्या संन्निकर्षातून वृत्तीज्ञान जन्माला येते. ज्ञान-ज्ञेय संनिकर्ष ही वृत्ती ज्ञानाची महत्त्वाची अट आहे. उलट साक्षीज्ञान संनिकर्षाशिवायही असू शकते. त्यामुळे ते सुप्तावस्थेमध्ये असते. सुख दुःखाचे ज्ञान हे वास्तविक वृतिज्ञान होय. पण या ज्ञानाकरिता वृत्तीला बाहेर जाण्याची म्हणजे ज्ञाताज्ञेय संनिकर्षाची आवश्यकता नसते.

वेदान्त मतानुसार ज्ञान निर्विषयक नसते. विषय नाही पण ज्ञान आहे असे होणेच शक्य नाही. भ्रमज्ञानामध्येही विषय हा असतोच. एवढेच नव्हे तर आपल्याला जेव्हा स्वतःचे ज्ञान होते. तेव्हासुद्धा आत्मा स्वतःच्या ज्ञानाच्या विषय असतो. विषयाशिवाय ज्ञानाची निर्मिती नाही. अशा रीतीने ज्ञानाला, विषयाची अट जरी आवश्यक असली तरी तो विषय इन्द्रियांद्वारे ग्रहण केला जाणे आवश्यक आहे. हे मात्र वेदान्ताचे मत नाही. इंद्रियांच्या अनुपस्थितीत देखील विषयाचे ग्रहण होणे शक्य असते. म्हणून सुःख,दुःखाचे ज्ञान त्याचप्रमाणे आत्म्याचे ज्ञान हे अशाच प्रकारचे उदाहरण आहे.

**सारांश**

अद्वैतवाद वेदान्तची एक शाखा आहे. भारतात निर्माण झालेल्या विचारधारेपैकी अद्वैतवाद ही विचारसरणी आहे. अद्वैत वेदांतात मानवी विचारांची सर्वोच्च अभिव्यक्ती झाली आहे. सामान्य जनतेच्या दृष्टीने विचार केल्यास तो फार गहन व उच्च कोटीचा आहे. अद्वैतवाद जवळजवळ तीन हजार वर्षांपासून भारतात असून तो सामान्य जनतेने स्विकारला नाही. नव्वद टक्के लोकांना त्याची तोंडओळख नाही. याचे कारण मानवी मनोवृती आहे. अद्वैतवाद ईश्वर हाच या विश्वाचा निर्माता असून विश्व ब्रम्हांडही तोच आहे यावर भर देतो.उत्पत्ती, स्थिती, लय व ब्रंम्हयाचा वेळ बिनतक्रार स्विकारा व तणावमुक्त अवस्थेत जगा, त्यासाठी मन निर्मळ व निर्भय ठेवा असे सांगून त्यांनी एकेश्वरवादाचा पुरस्कार केला. चराचरात सामावलेल्या परमेश्वराचा आदर करून वैदिक सनातन धर्म रुजवला. धर्माचा लढा गुद्यांनी नव्हे तर मुद्यांनी जिंकला. त्यासाठी सुंदर साहित्यकृती तयार केली. यामधून अद्वैतवाद हा सिध्दांत मांडला.

**संदर्भसुची**

१) ग. ना. जोशी, (संपा.),भारतीय तत्त्वज्ञानाचा बृहद् इतिहास, खंड १ ला, पृ.६.
२) एस. जी. सरदेसाई, भारतीय तत्त्वज्ञान वैचारिक व सामाजिक संघर्ष, पृ.८.
३) पूर्वोक्त. पृ.८.
४) दत्तवाडकर, भारतीय संस्कृतीची ओळख,(प्रस्तावना), पृ.६.
५) पूर्वोक्त. पृ.६.
६) जोशी ग. ना., (संपा.), भारतीय तत्त्वज्ञानाचा बृहद् इतिहास,खंड १ ला, पृ ५१५.
७) चौबे अर्जुन, (काणे पांडुरंग वामन), धर्मशास्त्र का इतिहास, पृ ७५.
८) भट्ट गोवर्धन, (अनु.), (सिन्हा जदुनाथ), भारतीय दर्शन, पृ १०२.
९) पूर्वोक्त. पृ १०२.
१०) सिंह सरिता, आचार्य शंकर का मायावाद - एक विहंगम दृष्टि, पृ ४०.

PRINCIPAL
Shivaji College, HINGOLI